म. ग्र. सं. ठाग
य काव्य
क. २९९९

पुरुषोत्तम शिवराम रेगे



# प्रियाळ

REFBK-0018595
REFBK-0018595

प्रकाशन गृह
मुंबई

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

70)

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

23 JUL 1975

16 AUG 1979

13 MAR 1983

[ कृ. मा. प. ]

पुरुषोत्तम शिवराम रेगे

# प्रियाळ

REFBK-0018595
REFBK-0018595

मौज प्रकाशन गृह, मुंबई

मौज प्रकाशन २१३

पहिली आवृत्ती : ऑगस्ट १९७२

© पुरुषोत्तम शिवराम रेगे, १९७२

किंमत आठ रुपये

प्रकाशक
वि० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी
मुंबई ४

मुद्रक
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
मुंबई ४

‘दुसरा पक्षी’ (१९६६) नंतर लिहिलेल्या सप्टेंबर १९७१ पर्यंतच्या माझ्या कविता या संग्रहांत एकत्रित केल्या आहेत.
संग्रह काढतांना क्रमाचा एक प्रश्न नेहमींच उभा राहतो. या वेळीं तो टाळण्यासाठीं ज्या क्रमानें त्या लिहिल्या गेल्या तोच क्रम ठेवला आहे. अपवाद फक्त ‘प्रियाळ’ या एकाच कवितेचा.

*पुरुषोत्तम शिवराम रेगे*

मुंबई
वैशाख शु० ५, १८९४
१७ मे १९७२

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| आहे हें जरी ठीक नसलें तरी | १ | आंधी | २९ |
| पुन्हां केव्हां तरी | ७ | अ ब क | ३० |
| तसं नसेल | ८ | उद्‌गार | ३१ |
| खूण | ९ | घड्याळ | ३२ |
| एक झेन कविता | ११ | भाषांतर | ३३ |
| मी पुष्कळ... | १२ | अभिलाषाच | ३४ |
| पिवळी | १३ | रात्रीची वाट बघतांना | ३५ |
| तूं लिहूंच नकोस | १४ | श्वास | ३६ |
| गतिविज्ञान | १५ | बकुळंच कां? | ३७ |
| होय आणि नाहीं | १६ | तुला वंचून | ३९ |
| आठवणींचें सराईत ओझें | १७ | रूप | ४० |
| छळ | १८ | एक शब्द | ४१ |
| मग | १९ | तूं नसतांना | ४२ |
| वारा | २० | रात्रीं | ४३ |
| हात | २१ | वारा | ४५ |
| एक | २३ | फुला | ४६ |
| चांदण्या | २४ | शब्द | ४७ |
| तूं | २५ | पुन्हां | ४८ |
| भर दुपारच्या उन्हांत | २६ | का | ४९ |
| दुःख | २७ | संग | ५० |
| जर | २८ | चांपेयाची पिवळी पवळण | ५१ |

एकहि दळ ५२
वाट ५३
भेट ५४
जवळ जवळ ५५
तो बाळकृष्ण, बाई ५६
मधल्या रात्रींच्या तीन कविता ५८
बोलणें ६०
जो प्रियूची प्राणेश्वरी ६१
वेडें आकाश ६२
तूं ६३
मोजतांना ६४
हिशेब ६५
भेट ६७
चरित्र ६८
भान ७०
दिवस ७१
रात्रभरीं ७३
आधार ७४
उद्गार ७६
गळ्यांत काळी पोत ७७
असें काय ७८
शेवटीं ७९
हात ८१
भाषा ८२
प्रियाळ ८५
शहनाज़ ९३

प्रियाळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७०५६६ वि: काव्य
... २१११ नों दि: २:२:

१.

दिवस असतो डोळ्यांच्या उघडेपणीं;
कुणी त्याला प्रकाशाची खूण देतात
सात घोड्यांच्या टापांना बांधून.
जून प्रवाशाच्या तोंडीं सहज तामिलीच्या
ऋचा त्याच डोळ्यांतून आकार घेतात,
गात नाहींत त्यांच्यासाठीं उगाचच रगड
दडवून ठेवलेल्या निराकार गुहांनाहि
कांहीं किमान अर्थ फुटावा म्हणून.
(कोण म्हणून आतां विचाराच तुम्ही.)
ब्रह्मी भाषेंत एक म्हण आहे (निदान असायला हवी) प्रश्नाला
प्रश्नच एक उत्तर असतं म्हणून.
कण्हून का रात्रीचा दिवस होत असतो ?

नसतो हेंच ठीक आहे,
आहे हें जरी ठीक नसलें तरी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १८५०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

२.

माग्दालीन किंवा आम्रपाली यांच्या कथा
आतांपर्यंत किती झाल्या, मोजून ?
खून आमचे आम्हींच पचवले आहेत
बेत अनारंभ शृंगाराचे अनादिकाल रचून.
अजून त्यांच्या निरर्गल केशसंभारांत
भ्रांत चित्तांना विसांवा नाहीं आमच्या;
त्यांच्या स्तनांवरच्या ताम्र ढालींवर
नश्वर आमचे ओठ कधीं फुटलेहि नाहींत—
घाईत किंवा सावकाश, अटळ किंवा अनिच्छ
स्वच्छ, सोऽहंकारी त्यांच्या डोळ्यांच्या वेलांटी भाषेला
तोलायला बघतों आम्ही आपल्या
ढिल्या अपाणिनीय कारिकांनीं.

कुणी गैषा म्हणतील हेंच ठीक आहे
आहे हें जरी ठीक नसलें तरी.

३.

गोमटेश्वरांच्या आंगावर ही वेल कां चढली?
वाढली? त्यांच्या जीर्णांगाला आव्हान म्हणून जाणून
बुजून कीं कलाकाराच्या अनिच्छ कुसराईनें?
तिनें एक दुसरेंच शिल्प भोगलेलें असतें,
ज्यांत असते वाढत्या दगडाची आवाहक ऋजुता,
उतावळ्या पानांची नियामक जाण.
प्राण ती आपल्या आपणच होते; सलोख्याच्या
व्याख्या ठरण्याआधींच
कधींच तिचा ठरलेला असतो लपेटणारा व्यूह
गुह्य प्रभूंच्या सान्निध्यांत, छायेंत.
येथपर्यंत आपण पोचूं शकतों आपल्या
उमललेल्या देहांतून, तीर्थंकरांच्या ओळींतून.

म्हणून हें सारें ठीक आहे,
आहे हें जरी ठीक नसलें तरी.

४.

वाटेच्या तहानलेल्याला तिनें पाण्याची धार दिली.
भली ती संतत धार आणि ओंजळींतून
गळून चाललेलें न प्यायलेलें पाणी !
कुणीं मग तिच्या डोळ्यांना कांहीं म्हटलें;
वठलेल्या त्याच्या डोळ्यांभितरचें कुळ पाहिलें.
पोळलेले त्याचे ओठ जे तसेच राहिले,
ओलें पाणी दवडीत, त्यांच्यावरच्या रेषा मात्र
रात्रभर तिच्या भाळावर कोरल्या
गेल्या असतील आणि अनिच्छ तिच्या
डोळ्यांच्या मंत्रमेघांतून त्यानें आपली
पहिली तहान शमविली असेल—
अवेळींच्या त्या तहानेचें प्रायश्चित्त घेत.

येथपर्यंत सारें ठीक आहे,
आहे हें जरी ठीक नसलें तरी.

५.

'आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्
तद्वत् कामाः प्रविशन्ति सर्वे—यस्याम्'
असें या अजिंठ्याच्या आत्मभोगी अप्सरेचें
आरेखन केलें आहे स्टेल्ला क्रामरिशनें. हिच्या
उच्चारांना आहे समजून पुन्हां समजलेल्या ओठांच्या
प्राचीन सूक्तांची धारा, न मिटतांच
मिटलेल्या डोळ्यांत संपूर्ण तृप्तीचें अनिच्छ दान—
आण-भाक, आज-उद्यां, मी-तूं संपवणारें, आणि पंखेरी
मुखावर भोगणारे, भोगवणारे
सारे राजवर्खी रंग अम्लान कुसुमांचे
(ज्यांचें नांवहि आतां हरवलें आहे.) जणूं
कुणी ही काळाचीच अकाल सहेली !

अकेली आहे म्हणून ठीक आहे,
आहे हें जरी ठीक नसलें तरी.

६.

केरळीय कलामंडलांतील नृत्याभ्यासिनी—
कुणी राधा कीं सुधा, प्रेक्षक : सेमिनारला आलेले लेखक
विखक, जवळचे हौशे, निमंत्रित स्थानिक,
अनिच्छ ती त्यांच्यांतच एकांतून एक रेखामंडळ जुळवून
उधळून देते आणि मंचासमोरची मोठी समई
जुईच्या नक्षत्रांच्या जाळींतून फुलून उठते. हात
दोन आवर्तांत आपल्या हृदयाशीं समांतर धरीत
लयींत जेव्हां एक-एक झुमकें पाऊल मागें
मागें
मागें
मागें घेत ती जाते तेव्हां
केव्हांच कांहींच कसें कळत नाहीं तिच्या पायाशीं
हाताशीं आपणच थिरकत असतों—
त्यांच्याच एवढे, तसेच, तिच्यापाशीं, तिच्याएवढे.

गडे, तूं आहेस म्हणून ठीक आहे,
आहे हें जरी ठीक नसलें तरी.

# पुन्हां केव्हां तरी

तुझ्या डोळ्यांना सांगायला हवं पुन्हां कांहीं बोलूं नकोस.
(ओठांच्या पापण्यांत मला मिटूनच घे.)
हाताचे पंजे तसेच ठेव (मांड्यांवर कोपरं टेकून) एकावर एक—
त्यांना दूर बसवायला हवं द्विविधा तुझ्या आच्छादित हृदयापासून
—आज.

....पुन्हां केव्हां तरी....
घेईन जेव्हां तुला (भरभरून, तुला हवी तशी)
अनबोल डोळ्यांसकट,
ओठांच्या त्याच चटुल पापण्यांतून,
हातांच्या भर राजवस्तींत
—अङ्गाङ्गून.

# तसं नसेल

आणि तूं भेटली होतीस असं मी म्हणालों का?
तसं नसेल;
अलगुजी काळोखांत एखादं वंजारी पांखरूं
पानांच्या टोळ्यांमधून पुन्हां एकदां उडून गेलं असेल.

तूं कांहीं म्हणालीस असं मी म्हणालों का?
तसं नसेल;
वाऱ्याच्या वहिवाटींत एखादं चिनगारी फूल
उद्यांच्या बोलीवर पुन्हां एकदां झुंबरलं असेल.

तूं कांहीं दिलंस असं मी म्हणालों का?
तसंहि नसेल;
रात्रीच्या सांखळींत एखादी रंगारी धून
दंवाच्या वाटेवर पुन्हां एकदां फुटली असेल

## खूण

खूण माझी आकाशाला
धगधगणाऱ्या सूर्याला
पाझरणाऱ्या चंद्राला
खूण माझी....

खूण माझी धरतरिला
धरतरिच्या काकुळतीला
पोटांमधल्या सीतेला
खूण माझी....

खूण माझी डोंगराला
वादळामधल्या ढोरांना
ढोरांमधल्या कान्ह्याला
खूण माझी....

खूण माझी पाणवठ्याला
नदीकांठच्या बेटाला
दाट खुणावू वेताला
खूण माझी....

खूण माझी खुंणवालीला
खुणवालीच्या चोळीला
चोळीमधल्या होळीला
खूण माझी....

## एक झेन कविता

मीं दोन दिले, दोन घेतले.
पण त्यानें काय झालें ?

आतां दोन देणार, घेणार नाहीं;
दोन घेणार, दोन देणार नाहीं.

दांड्याला असतात दोन टोकें
पण दोन हातांना एकच डोकें.

## मी पुष्कळ....

मी पुष्कळ मला समजावतों....
एकाच वेळीं या जगांत
आपणां दोघांना जागा नाहीं म्हणून.
तुला व्हायला हवं एक पोरकी पुरंध्री
दूर नित्याच्या बावरलेल्या नात्याची;
मला व्हायला हवं खूप खूप मोठं
नावरलेल्या एकदांच्या एका आकाशाएवढं.

आणि तरीहि....किंचित् जेव्हां कुठं एखादं
विसरलेलं फूल सुकायचं आठवतं
तेव्हां तुझ्या ओठांच्या काठांवर
त्याच्या गुणलेल्या पाकळ्या जमूं लागतात—
पहिल्या सांवरलेल्या भेटीसारख्या—
आणि तुझ्या डोळ्यांच्या सांवलींतून उतरतं
अचानक आवरलेलं सदाचं असह्य आकाश.

# पिवळी

कठोर
पुढें मोठी घट्ट गांठ मारलेलें
फक्त एक पिवळें जर्द नेसूं.
वर कांहीं नाहीं.
खालीं जुवारी केतकी
पाय
—मोकळे, पटाईत.

निर्घोक
दोन डेरेबाज लालबंब सूर्यांवरच
माझ्या पाहुण्या पापण्या मिटल्या;
अधिक वर मीं पाहिलेंच नाहीं.
तिच्या बेहद्द डोळ्यांभोंवतालीं
नक्की
फॅन गॉफची रंगधुमाळी धुंवारली होती असणार.

## तूं लिहूंच नकोस

तूं लिहूंच नकोस;
शब्दांनीं तुझी धास्ती घेतली आहे.
—आणि तूं सांगणार तरी काय
जें मला माहीत नाहीं ?

तें घर, भोंवतालची झाडी,
बाजूचा बंदिस्त कालवा,
न टळणाऱ्या वाटा—
येत्या हिंवाळ्यांत साऱ्यांनाच बर्फाची
पालवी फुटणार आहे.

तीं हातांतलीं फुलें मात्र
तशींच ठेव—गोठलीं तरी, सुकलीं तरी.
न जाणों त्यांना तेव्हांच मुळें फुटतील
तुझ्या हातांतून इथें या माझ्या हातांत—
आजवरच्या न वापरलेल्या
शब्दांना डावलून.

## गतिविज्ञान

बंदुकींतून गोळी मारतांना
तिचा मागचा आघात सांवरण्यासाठीं
दस्ता खांद्याकडे नीट बसवून घ्यावा लागतो.
ॲक-ॲक गनमधून पटापट गोळ्या सोडतांनाहि
याच मागच्या आघाताची
सोय करावी लागते.
तोफांचें गुळगुळित मझलहि
गोळा सुटतांना आधीं थोडें मागेंच येतें.

विमानांतून पडणाऱ्या बॉंबना
हें मागें खेंचणारें बंधन नसतें.
तें असतें वर अंतराळांत;
त्याचें जमिनीशीं नातें असतें
रेडियो-सूचनांपुरतें, रेडार टाळण्यापुरतें.

खालीं जे मरतात
त्यांचेहि बंध सुटलेले असतात—मागचे, पुढचे.

सगळ्यांचीच नवीन सोय होते.

# होय आणि नाहीं

होय आणि नाहीं
यांच्याहि पलिकडे असतें कांहीं.
अनभिज्ञतेचा आव सगळ्यांनाच आणतां येतो.

नको आणि हवें
यांच्याहि पलिकडे असतात उंडारलेले रावे.
परिचिताला सगळेंच कांहीं अपरिचित असतें.

तूं आणि मी
यांच्याहि पलिकडे असतो एक 'मी'.
तुला हें सगळें ठाऊक असतें....आणि मला ?

मला जर हें असतें
तर कांहींच कांहीं इथें नसतें,
होय आणि नाहीं सगळेंच उलटलेलें दिसतें.

# आठवणींचें सराईत ओझें

आठवणींचें सराईत ओझें
माझ्या माथ्यावर नसतेंच.
मी सरळ पावलांनीं चालणारा
उरांत एक आशा बाळगून.

मला कांहींच कधीं कळलें नाहीं;
तूंहि कधीं कळली नाहींस—
बोलाचे पदर उलगडण्याआधींच
साधी भाषाहि सोडून दिलेला.

तसें म्हणायचें तरी काय होतें ?
होतें-नव्हतें तेंच तर होतें.

## छळ

छळणारा आणि छळून घेणारा दोन्ही एकटा तूंच....
तुझ्यासाठीं असणार तिकडे वाऱ्यावरचा निवारा,
बोलाचाच अबोला,
कठोर मिठीचाच घट्ट कोंडमारा.

घनघोर वादळांतहि तूं असतोस आधींचाच चिंब उदार;
मिटलेल्या चोंचीचें एक पांखरूं,
बुजलेलें फूल—
अचानक सगळे तुलाच बघतात सांवरूं.

पण मीं नाहीं तुला कधींच वागवलें....
डोळ्यांच्या विंझणभिंगांत तुझें सांडलेलें रूप,
कडियाळ मांड्यांच्या खोप्यांत
खोल—तुझी खूण एकदां जपली हेंच अप्रूप.

छळणारा आणि छळून घेणारा दोन्ही तूंच...

## मग

मग मीं काय मागायला हवं होतं ?
ओठांचा चारा ?
मोकळ्या स्तनांचीं ताटं ?
बोटांची अगोचर वाट ?

खरंच मी अजून कांहींच शिकलों नाहीं—
अनोळखी सांज,
त्याहून अधिक अनोळखी रान
आणि उगाच गोंजारलेलं मन !

आतां तरी मला हें सांगशील का :
ती डोळ्यांची कोयल,
तें कसून डहुरलेलं झाड—
उलट्या आभाळालाच का शिकवीत होतीं धडधड ?

## वारा

हा वारा असा वाहूं लागला कीं तुला काय आठवतें ?
मी झाडांबद्दल बोलत नाहीं
किंवा अकारण उडणाऱ्या बोलघेवड्या पक्ष्यांबद्दल—
मीं त्यांची संगत केव्हांच सोडली आहे.

तूं तेव्हां डोळे मिटून घेतले होतेस,
श्वास कुठें तरी खोल लपवून,
ओठांच्या लिलीवर एक भंवर शब्द खिळवीत,
हातांचीं बोटें तशींच डोक्याखालीं राखून ठेवीत.

मी आतां कशाबद्दलच बोलत नाहीं;
तुझ्याबद्दलहि बोलत नाहीं,
माझ्याबद्दल तर नाहींच नाहीं—
हा असा वारा वाहूं लागला कीं त्याला फक्त वाहूं देतों.

# हात

हात हातांसारखे.
डोळे डोळ्यांसारखे.
आणि मन ?
तें होतें माझ्यासारखें
दूर भटकणारें.

तळ्यावरच्या पक्ष्यांना
त्याची चाहूलहि नव्हती
ढगांचीं शिडें तशींच
त्यांच्यासाठीं सहज
खालीं पाण्यांतच होतीं.

त्यांतला जेव्हां एखादा
किर्रबाज उडतो, हरवतो,
तेव्हां त्यालाच घेऊन जातो
ढगांच्याहि पलीकडे
आणि पुन्हां पाण्याच्याहि तळाशीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 78595

मग भेटतात ते सगळेच
तुझेच हात, तुझेच डोळे,
हरवलेलें तुझें मन
आणि बुडालेल्या आकाशाचा
मुकाट हुर्मुजी कांठ.

# एक

मीं पुष्कळांना पुष्कळ सांगितलं
पण एक नाहीं कधीं सांगितलं—
ते दूरच्या पांवरीचे स्वर
माझ्यासाठींच होते म्हणून.

तोहि कधीं बोलला नाहीं—
एका शब्दाचा आधार घेऊन.
रानाचा त्याला भरंवसा नव्हता;
पाण्याची त्याला शपथ होती.

# चांदण्या

वेगळ्याच आभाळाला या चांदण्या लटकल्या आहेत
कारण तेव्हां हें असें नव्हतें.
तेव्हां एक एक मोजतांना
तुझ्यापासून प्रत्येक वेळीं सुरुवात केली होती.

तूं फुलें जीं उधळलींस रानभोर
त्यांच्याहि झाल्या होत्या चांदण्या
आणि तुझ्या मिटलेल्या दोन पापण्यांवर
मी मोजायचा पुन्हां थांबलों होतों.

७८८६६ काव्य
२१११ २.२.

# तूं

तूं म्हणाली होतीस :
चांदणं पाण्यांत डुंबतं
तेव्हां आपण बोलायचं नसतं
कारण तेव्हां तें एकटं असतं.

भर दुपारच्या उन्हांत
ढगांच्या सांवलींत
माळाला थोडा विसांवा घेऊं द्यावा;

विसरायचं तें
विसरून झाल्यावर
तो नाहीं पुन्हां दया याचणार.

# दुःख

दुःख ?—तें तिला विचारा.
ओठांची हार ?—ती तिला सांगा.
सोडलेले हात ?—ते तसेच राहूं द्या.
मला हें सर्व कांहीं नवीन आहे.

कुणि तरी तिला एकदां भेटलें होतें,
थकलेल्या ओठांवर ओठ गोठवले होते,
मोकळ्या हातांत सुकाळ जोजवलें होतें—
अजून तिला हें सारें विसरायचें आहे.

# जर

जर मीं तुला कांहीं विचारलं
तर तूं कांहीं सांगशील का?

हें असं इथून
आकाश खालीं कां दिसतं?
हीं झाडांचीं पानं
अगदीं मुळींच कां हालत नाहींत?

त्या, त्या दिवशींच्या तळ्यावरचा
एकहि पक्षी बुजला कां नाहीं?
कांठावरच्या त्या पिवळ्या फुलांत
एकच जांभळं फूल कसलं होतं?

अगदीं पहिल्यांदा तुझ्या ओठांना
तूं घट्ट कां मिटलंस?
तुझे गाल अगदीं थंड थंड कां होते....
कीं मलाच तसं वाटलं?

आणि पुन्हां हें असंच होणार आहे का
तूं कांहीं सांगायच्या पूर्वींहि?

## आंधी

मला जें ठाऊक आहे तें एक अयाचित झाड,
विसरलेल्या पायांखालची अबोल वाट,
मानलेल्या आकाशाचा अजस्र पहारा—
आणि त्यांत तूं एक अटळ.

आतां फार उशीर करून उपयोगाचं नाहीं—
आंधी तिकडे दूर फिरायला लागली आहे,
आणि मला उगाच भीति वाटते
माझ्याच अकलंक पायांची, तुझ्या धडधडणाऱ्या डोळ्यांची.

# अ ब क

तुला कंटाळा आला आहे अ, ब, क या गोष्टींचा.
अ कांहींच म्हणत नाहीं,
ब ला विचार करतां येत नाहीं,
क असणार सर्वस्वीं निराधार.

त्यांना सांधील असा त्रिकोण
तुझ्या चौकटींत बसतच नाहीं;
तुझ्या उमजलेल्या मनाला
भितच होते एक एक आग्रही रेषा.

आणि मी हा असा असंग पाहतों तुझ्या डोळ्यांत—
निमूट चकमकीच्या आंत,
तुझ्या दगडलेल्या ओठांवरच्या रेषांवर उठवायला
एक अलोट वादळाचा पूर
ज्यांत भिडतील अ, ब, क, ड, ई, तूं, मी आणि सर्व
आपल्या असंख्य छेदक रेषा निर्दाळून.

## उद्गार

सहज वेडावलेल्या मनाचा एक प्राहेलिक
उद्गार.
त्याच्या विस्कटलेल्या स्वरांतून निसटलेला
हुंकार.
उण्या मिठींत भडकलेला अंधारांतला
अंगार.
घट्ट मुठींत मुडपलेलीं चार पोवळीं
गार, गार.

# घड्याळ

बंद पडलेलें घड्याळ
दिवसांतून दोन वेळां
अचूक वेळ दाखवितें.

त्यावेळीं तूं आणि मी
—दोन वृद्ध युवभावी—
हातांत हात घेऊन बसूं.

तुझ्या भस्मी डोळ्यांना
मी माझे डोळे देईन.
चिंधुल्या ओठांना माझे ओठ.

तूं बोलणार नाहींस
तें मला समजलें असेल;
बोलशील तें मीच बोलेन.

## भाषांतर

रस्त्यांत मी एकटाच असतों;
चारचौघांत मी नसतोंच,
जें मनांत असतें
त्याच्याहि पलीकडे ओळंगलेला.

तुला असते एकच भीति
सतत चमत्कारिक लोकांच्या पुस्तकांची,
खरें तर तूं असतेस
स्वतःलाच घाबरून दिवसरात्र हरवलेली.

मीं जर म्हटलें आपण दोघेंच आहोंत
या भटकत्या आकाशाच्या पडद्यांत,
तर तुला कोंडतात
अनोळखी भिंती, ते ओळखीचे पुस्तकी मोहरे.

पुस्तकांत तूं पुष्कळ वाचलें असशील
—त्यांना असतात शाईचे कप्पे—
पण एका रस्त्याचें एक भाषांतर
असें टप्प्याटप्प्यानें कधींच झालें नाहीं.

# अभिलाषाच

अभिलाषाच जर दुःख झाली
तर तिच्यांतून नंतर अलगणाऱ्या दुःखाचें
नवीन नांव काय?

मीं एक विषाचा समुद्रच रिता केला आहे
सगळ्याच दुःखांना आटवायला
—आधींच्या, नंतरच्या.

उरलें आहे तें एक रेताड मन
रित्या समुद्रापलीकडची तुझी हांक,
त्या हांकेचा निरस्त आकार.

# रात्रीची वाट बघतांना

रात्रीची वाट बघतांना
सबंध पहांट फुटते,
वाढलेलें डोळ्यांचें ओझें
डोक्यावर घण घालतें,

कठोरशा फुलांची जाण
वाऱ्याला नाडून जाते,
भिजलेल्या मातीची लव
एखाद्या झुडुपाला मिळते.

आतां किलबिलाट होईल
तो वेड्या पक्ष्यांचा
थयथयाट त्यांच्या आड-
-दांड सूर्यनारायणाचा.

## श्वास

अनिकेत श्वासांना मी हांक मारतों....
त्यांचा प्रांजळपणा त्यांनाच ठाऊक नसतो :
विस्तारलेल्या वृक्षांना त्यांची चाहूलहि नसते :
अनाठायीं उडणाऱ्या धुळीला फक्त वाराच भावतो.

"या, या....अकुतोभय, या....आमचे व्हा.
आमच्यांत पुरेपूर मिसळून जा,"
मी सारखें त्यांना घोकून आळवतों;
माझेहि श्वास त्यांना देऊं करतों.

उधळलेल्या आकाशाच्या छावणींत ते मावत नाहींत;
फुटलेल्या लाटांतून ते बुडून वर फेंसाळतात.
मी कोंडून घेतों माझ्यांत जितके सांपडतील तितके
आणि अचानक होतों त्यांच्याच सारखा सराईत अनिकेत.

## बकुळंच कां ?

बकुळंच कां ?
कारण तीं कधीं बावत नाहींत.
(नाहींत, हें तसं तितकंसं खरं नाहीं.)
आणि त्यांचा रंग
सांवळत, ढळत तसाच राहतो,
अगदींच कसोशीनं मावळत नाहीं
—रंग आणि आकार.

आणि वास ?
वास—उदास,
किंचित् धडकणाऱ्या
उण्या श्वासांचाच,
दोन ओठांच्या चुण्यांवर—आसपास—
क्वचित् थोडा मानेखालींहि,
संकोची.

शिवाय आधींच वर डोळ्यांत
त्यांतलींच दोन फजूल बकुळं
बुब्बुळं.

म्हणून बकुळं.

# तुला वंचून

तुला वंचून एक सदोदित गुह्य
        मी आंतल्या आंत सांठूं देतों.
त्याच्या कुसांवर माझ्या जाणिवेची
एक खूणसुद्धां उठूं देत नाहीं;
        एक एक तसेंच सलूं देतों.

तुला हें कुठेंच कळणार नाहीं,
        कारण आंत-बाहेर मी कुणीच नसतों.
हें दुःख, ही उणीव, ही परात्पराची शींव—
हें सगळें कुणा तरी पुण्यात्म्याचें असतें;
        माझ्यापुरतें मी हें सगळें निरवून असतों.

आरशांतलं रूप तसंच राहिलं
        चौकटींतल्या चित्रासारखं.
        मंथर, पण स्थिर,
डोळ्यांच्या बाहुल्यांत जगावेगळं.

मूळ असेल का असंच छबीदार,
        देहाच्या घरट्यांत जपलेलं
        अटळ, निव्वळ
—पुन्हां मनाच्या अंगणांत मनखोरं ?

सांगणार कसं कोण कुणाला ?
        बोलाच्या पांखरांना देणार कशी हांक....
        आ....आ....आ....
आ चा आरसा भिजतांना अतूट असा उशाला ?

## एक शब्द

एक शब्द दोन ओठांहून अधिक;
दोन ओठ चार पावलांहून.
हें सगळ अंतर पाहून
आणि साहून.

ठेवणींतलें एकेक चित्र उणें करतांना
एकाला असें समजवावें लागतें :
उणावलें तें दुणें होतें,
पुन्हां भावतें.

चतुर मेधावी याहून अधिक
कांहीं सांगतीलहि नवें,
नाहीं असें कसें गणावें,
कुणीं म्हणावें ?

# तूं नसतांना

तूं नसतांना
हा उगाच होन-पिसारा
सूर्याचा,
वाऱ्याचा झुमकी पांवा
सोनल सलगीचा.

तूं नसतांना
हा उगाच कोयळ कोहे
जाळींत,
वाटाही अलगद फुटती
अनघड झाडींत.

तूं नसतांना
मी मीही नाहीं म्हणतों
साऱ्यांना,
माझाच पिसारा, पांवा
सगळें असतांना.

# रात्रीं

रात्रीं
मला वाटलें
माझ्या डोळ्यांतल्या काहुराचा
अदमास घेण्यासाठीं
तूं
तुझ्या उजव्या हाताचा
कोपरापुढचा
सोनसडक कोंभ
त्यांच्यावर हलकेच कलथूं दिलास.

मींहि
तो तसाच राहूं दिला
अगदीं घट्ट
दाबून धरावासा वाटत असतांहि.

त्याला
माझ्या त्या वेढलेल्या डोळ्यांतलें काहूर
कांहीं कळलें का ?
आंसवें तिथें नव्हतींच—

तेहि होते तसेच थंड-मोकळे
त्यांच्यासारखेच
अळगलेले.

आणि आंसवें तरी किती
कुठें पुरीं पडणार
अथांगलेल्या अशा वेड्या, आंधळ्या
रात्रीला ?

# वारा

हा वारा असाच वाहणार,
हें झाड असेंच उभारणार,
हें आकाश असेंच कळणार—
मी त्यांचा होत नाहीं तोंपर्यंत.

नंतर, कुणीं कसें सांगावें—
हा वाराच झाड होईल,
हें झाड जुनें ऊर्ध्वमूल आकाश
आणि आकाश वाऱ्याचेंच एक नवें बोलणें.

# फुला

पहिल्या त्या धुक्याचा आतां पहाड झाला आहे,
दंवाचे असंख्य अणीदार खडे,
शेलाटी वाऱ्याचा लांबच लांब पोलादी पट्टा—
पलीकडे पाहीन म्हटलें तर हे डोळे
असे थिजून अडलेले.

हे रानजाईच्या पहिल्या फुला,
आतां मी तुझ्यासाठीं काय करूं ?

# शब्द

तुझ्यापाशीं शब्द नाहींत,
तुला बोलतां येत नाहीं,
तुला फक्त दुसऱ्याला बोलकें करतां येतें.

आणि तो बोलतो तेव्हां
त्याच्यापाशीं फक्त शब्दच असतात का ?
तो असतो का ?
तूं असतेस का ?
कांहींच कांहीं असतें का ?

## पुन्हां

ओठ
तिचे सांगतात
तीच पुन्हां अंगलगी गोष्ट.
कोण
त्यांना सांगणार
पराविये मन हरवलं आहे म्हणून ?

रात्र
पुन्हां भिडते
पांघरून तींच ठकार नक्षत्रं.
कोण
तिला सांगणार
जडावाचं काम संपलं आहे म्हणून ?

# का

उन्हाच्या पावलांनीं
तान्हाच्या बोलांनीं
        येशील का ?
        नेशील का ?

कधींच्या वाटेवर
मधींच्या कांठावर
        थांबशील का ?
        लांबशील का ?

झाल्याच्या होळींत
गेल्याच्या ओंजळींत
        ठरशील का ?
        उरशील का ?

उन्हातान्हांत
कधींमधीं जें
झालें गेलें तें
        देशील का ?
        घेशील का ?

# संग

मनाचिये आंत
कोण्या दीपिकेची वात ?
बोलाचिये पोटीं
कोण्या मोलाची हे गोठी ?

मन-बोला-संगें
जीव राधिकेचा रंगे.
हारवली वो ऐसी
श्याम, मुकें कासावीसी !

# चांपेयाची पिवळी पवळण

चांपेयाची पिवळी पवळण
कान्ह्यासंगें घाली फुगडण
मन ओंवाळुन तन भोंवाळुन
घाली फुगडण राधा गवळण
राधा गवळण घाली फुगडण

आतां कवळुन आतां जवळिं न
वनराईसह कान्हा घुमवुन
पिवळी पवळण काळी कमळण
घाली फुगडण राधा गवळण
राधा गवळण घाली फुगडण

# एकहि दळ

एकहि दळ झाडाचें
गंवसे ना तें पहिलें,
काय पहा हें झालें
सगळें हरवुन गेलें.

नक्षत्रांची राणी
कोमावुन मावळली,
वाऱ्याची लाट उभी
वरवर जाउन फुटली.

मीच इथें नाहींसा
माझ्यांतुन मालवतों,
काय कुठें आठवतां
आज असा पालवतों.

## वाट

मीं वाट पाहिली नाहीं;
विसरायचा फक्त प्रयत्न केला.
आणि तूं ?
तूं पाहिलीस ?
विसरायचें तुला होतें—
किती, केवढें ?

तापलेल्या ओठांचे चटके,
डोळ्यांतलें अबोल तांबडें,
हातांतल्या छिप्प बोटांची धगधग,
उरांत पोखलेला निखारा—
जाळणारी अशी एक रात्र,
भर हिंवाळ्यांतली, गात्र न् गात्र.

## भेट

पाचूंचे खडक
    वर जांभळ्या वेली
फुलें पिवळीं धमक
    केसरें सलग निळीं

असा एक बाग
    आंत कोणी निराळा
डोळ्यांचाच भोग
    सहज होऊन राहिलेला

वर-खालीं धुकें
    नव्या दाटल्या भेटीचें
मन मुकें-मुकें
    बोलाच्याच साथीचें

नक्षत्रांची चित्र-लिपि
  हृदयाकाशीं थरथरते,
अरूप वाऱ्याचें झिपरें
  माथ्यावरतीं भिरभिरतें,

वनराजीची रस-यात्रा
  गात्रांमधुनी झरझरते,
जळ गंगेचें शीतळ निर्मळ
  डोळ्यांमधुनी पाझरतें.

जवळजवळ तुजपाशीं येतां
  जवळजवळ सगळें होतें.
दिठी-मिठीच्या उत्सव-रंगीं
  दूर-दूरचें नातें जडतें.

## तो बाळकृष्ण, बाई

मी सुवासिनी
कुणि मनांत शिरलें निद्रेंत
अन् इवलासा
हात फिरकला डोईंत.

“तो बाळकृष्ण, बाई
तो असेंच करितो कांहीं.
तो येइल ग
रूप घेउनी इवलेंसें
अन् होइल ग
सगळें नव्हतें होतेंसें.”

मग मी हातांत
तो हात घेउनी लगोलग
धरिला ओठांशीं
धरिला, वरिला तो उगाच का ग ?

“तो बाळकृष्ण, बाई
तो असेंच करवी कांहीं.

तो म्हणेल ग
रूप घेउनी इवलेंसें
तूं माझिच, माझिच ग
अन् फिरेल सांगित भलतेंस."

मी सुवासिनी
पण जनांत आतां नुरलें ग;
तें रूपच इवलेंसें
मनांत नांदे, धुंदे ग.

"तो बाळकृष्ण, बाई
तो असेंच कांहीं करुनी जाई."

## मधल्या रात्रींच्या तीन कविता

१.

उद्यां मी बांधुन ठेवीन
हें माझें मन,
पण आज तसें सांगूं नका
आज हें माझें नाहीं.

२.

कराराच्या
दोन अटी होत्या—
तिच्या आणि माझ्या कराराच्या
दोन अटी होत्या.
पहिली : तिनें तो केव्हांहि मोडावा;
दुसरी : मीं तो कधींहि मोडतां कामा नये.
पहाडांतल्या प्रतिध्वनीला साक्ष ठेवून
आम्हीं शपथा घेतल्या,
वाऱ्याची बिछाईत केली,

चांदण्याची दुलई ओढली,
आणखी कांहीं आणि कांहीं—
पण अजून
कराराची पहिली अट तिनें पाळलेली नाहीं.
मग दुसरीचें मीं काय करायला हवें ?
करार करारच ठरतो काय ?

३.

कुणींहि यावं
कांहींहि सांगावं.
उरतील ते सगळे शब्द
        आपले आहेत.

# बोलणें

तूं बोलत नाहींस;
तेव्हांहि कांहीं बोलली नाहींस.
जें समजायचें
त्यांतून मीं एक अलाहिदा अर्थ काढला.

त्याचींच हीं गाणीं झालीं,
कांहीं कहाण्या,
एक-दोन अनोळखी संवाद,
अर्धे-मुर्धे दर्शन.

मग मला समजलें
हेंच तुझें बोलणें होतें,
सहज मनमोकळें
पहांटेच्या अरुवारीचें.

## जो प्रियूचि प्राणेश्वरी

असती सत्तेचेंच माहेर तूं
वेल्हाळलेल्या विश्वाचा नाथू.

तुझिया आवडीनें जें जें उदेलें
भोक्तेपणाविण तूं भोगियेलें.

ज्ञान सर्वस्व माझें तैसेंचि राहिलें,
वेगळेपणामाजीं तंडून पडलें.

कां मज भ्रमविसी येथें ऐसें उगा
जेथें मीपणच माझें बेंबतें गा?

ज्ञान तुझियाच आहे त्या सत्तेचें
त्वदानंदींच ना मायेल हें कैचें?

जो प्रियूचि प्राणेश्वरी म्हणवीयेला
तो ऐसा येकाहारी येकांगिला.

# वेडें आकाश

वेडें आकाश
कुणीं तरी घेरून टाकलें आहे
चांदण्यांची धांवपळ सुरू आहे.
सरी कोसळतात
त्यांना मी झेलून धरतों आहें.
मातीला मीं कधी 'नाहीं' म्हटलें आहे का?
ती भिजते माझ्यासाठींच—
भिजते, वाढते.
आणि मी हा असा
वेडा आकाशासाठीं!

# तूं

तुझ्या डोळ्यांतलें
निळें कीं काळें कीं खुळें
मला कळलें नाहीं
—कळलें तें तूं.

तुझ्या ओठांतले
झेले कीं झोले कीं ओलें
मला कळलें नाहीं
—कळलें तें तूं.

तुझ्या उरांतलें
भोळें कीं भाळें कीं होळें
मला कळलें नाहीं
—कळलें तें तूं.

# मोजतांना

मोजतांना इथून मागें
जीव माझा खुळा भागे,
        मोजतांना इथून पुढें
        जीव माझा उगाच उडे.

कधीं काळीं होऊन गेलें
त्याचे उरले दोन झेले,
        खोल कुठें भिडले सूर;
        मिळत नाहीं खुडलें ऊर.

कधीं कुणीं येईन म्हटलें,
ओठांवरतीं ओठ पेटले.
        त्याचेंच रान होऊन उठलें;
        कुणी नाहीं कुणा भेटलें.

म्हणून काय ? म्हणून हाय—
मोजणारा तो मोजून जाय.

## हिशेब

"बसा हं, मी आलें", तूं म्हणालीस.
मी बसलोंच होतों.
थोड्या वेळानें तूं आलीस
टापटिपीनें कामें आटोपून
—आलीस आणि आलीसच नाहीं.
आजूबाजूच्याच दोन गोष्टी केल्यास—
हें, तें आणि कांहींसें तसें, कसें—
मी कोणी आलोंच नव्हतों.
माझ्याबद्दल एक अक्षर नाहीं.
आणि शेवटीं जेव्हां धीर करून मीं विचारलें,
"तुझी प्रकृति कशी आहे?"
तेव्हां फक्त म्हणालीस, "चांगली आहे."

मी तुझ्या डोळ्यांत पहात होतों,
ओठांवर,
गालांवर,
हातांच्या बोटांवरच्या सुरकुत्यांवर,
खालीं फिक्या, मुक्या पायांच्या लाकडांवर
—स्वतःलाच विचारीत

हें केव्हां कसें झालें
मी संपल्यावर कीं संपण्यापूर्वींच ?

मी उठलों.
कांहीं आणलें होतें तें दिलें.
—देण्यासारखें होतें तें तूं कधीं
घेतलेंसच नाहींस—
आणि आज हा असा
प्रकृतीचाच हिशेब तेवढा राहिला—
दोन मनांच्या मोडणींत
ताळेबंद.

# भेट

भेटतां कधीं तूं
  भेटतों मला मी
उधळून उसासे नवे-जुने;
उरतेस एक तूं
  सांवळी मोकळी
पाहिली तुला जी पहिल्यानें.

भेटतां कधीं तूं
  भेटते सुखेंहि
खोल कधींची एक असोशी;
जाणूनि हरखते
  ठाऊक तुला ना
किति उदास जन हा मनवासी !

# चरित्र

कांठावरचें पाणी रेंगाळतें
आकाशाचा एक तुकडा
चुंबळीत
आणि सबंध आकाश होतें
चरित्राकार.
ढगांच्या पोवळ्यांतून
डोकावतात
गाथलेल्या नक्षत्रांचीं रत्नें,
खोल सूर मारणारे सुपर्ण,
टपोरलेली गडद निळाई.
इथून तिथें पसरतो
एक माझाच पट उलट-सुलट
पहात
मला हरवलेला.

तूं मनांत जें धरशील
त्याचेंहि उत्तर आहे
या आकाशांत
निरालंब....

हरवलीस मात्र म्हण.

भान

फुललें-फुललें त्याचें
तेज महुरलें
आकाशावर भान बिंबलें.
बीजास्तव एका
वृक्ष वाढला
नांव तयाचें नंद जाहलें.

जें परिमळ-लोभें
रान लोटलें
सहज हरवुनी लुटलें गेलें.
अजि दिशा-दिशांचा
कोष मोडुनी
परकीयेनें घर फिरवियलें.

# दिवस

आणि तुला आठवतील ते कुठले दिवस ?
अलौकिक तळ्याकांठचे
निखळ भिजलेल्या रानपक्ष्यांचे
विनाकारण माघारणारे ?
कीं समजावलेल्या खोलींतील
झपाटलेल्या अतूट श्वासांचे
नको-नकोनें रेंगाळणारे ?
कीं ते फुल्लारलेल्या वाटेवरचे
चुकार गर्दीचे
सुजाण, मंतरलेले, बागडणारे ?

आठवतील तर पुन्हां एकदां
विसरून जा.
विसरायला हवें हें पुन्हां पुन्हां
तूंच मला सांगितलेंस ना
....आठवणीनें ?

माझा मात्र असतो एकच दिवस
दरोबस्त रात्रंदिवस
सर्वार्थी हरवलेला.

## रात्रभरीं

रात्रभरीं । मुखीं हरी
एक हरी । बोल हरी
हरी हरी
मनवित कुणि ही बन-गौरी
रात्रभरीं । बोल हरी ॥ १ ॥

रात्रभरीं । दीप उरीं
एक उरीं । दीप हरी
हरी हरी
फुलवित कुणि ही बन-गौरी
रात्रभरीं । दीप उरीं ॥ २ ॥

रात्रभरीं । गात्र हरी
रात्र हरी । गात्र हरी
हरी हरी
बहरत राधा बन-गौरी
रात्रभरीं । गात्रभरीं ॥ ३ ॥

# आधार

आणि शब्दांचा आधार तुटला होता
तेव्हां पहिल्यांदाच
मी तिच्याशीं बोललों
—अखेरचें, खरोखरीचें.

अगदीं एका क्षणापूर्वीं
शब्दच उमटला नसता,
डोळ्यांची वाट मोकळी झाली असती
आणि ते तसेच
तिच्या मांडींत उसवले असते.
पण अचानक एकापुढें एक
त्यांचे वर्ण उभे राहिले
—नाहीं चतुराई कीं खळखळ—
चार चौकशा,
आल्यागेल्यांचीं चुटपुटतीं नातीं,
लपेटलेलीं प्रावरणें,
—त्यांतच एक चुकलेला मी,
हरवलेली ती,
आणि पुन्हां पुन्हां भिडणारा

तोच अनाग्रही काळ,
ज्याला भूत ना भविष्य.

बोलणें झालें तें शब्दांचें
—मी कांहींच बोललों नाहीं.

तूं बोललीस तरी का ?

# उद्गार

१.

आपणांला दोन गोष्टी
        टाळायला हव्यात :
तुला मी; मला तूं.

२.

अलीकडे पुन्हां स्वप्नांत
        सारखा तूच येतोस.
कां हा माझा इतका ध्यास ?

३.

पहिलें आठवायला जर
        इतकीं वर्षें लागलीं
तर विसरायला किती लागतील ?

# गळ्यांत काळी पोत

गळ्यांत काळी पोत
उरांत पवळी ज्योत
आली हरवुन ही गणगोत.

घरांत धगधग धाक
कुठें न श्यामल हांक
घाली कवळुन कोमल भाक.

वनांत भिजली रात
गढींत कुजबुज बात
गेली ठकवुन हातोहात.

असें काय
कीं ज्यामुळें
आपलीं हृदयें जुळावींत,

अजून तर
कांहींच कुठें घडलेलें नाहीं,
कांहींच कधीं घडणारेंहि नाहीं !

# शेवटीं

आणि शेवटीं काय ?
एक वाढणारें अनावर धुकें,
विक्राळ सागराच्या तळची प्रदीर्घ शांतता,
आकाशाची अनहंकारी अलिप्तता....
एक अध्याहृत प्रश्न
आणि त्याचें सहज झुकणारें उत्तर.

आणि तरीहि
प्रत्येक बोटांत एकेकाची वाट असते
वर कांखेंत
कुंभाराची वाट शोधीत
हंसवून गडबडा लोळवणारी,
तोच
तसाच
तळहातावरचा नाचरा मोर,
तीच पहिल्या पावलांची भिरभिर गिरकी
—आणि मग नंतरची पुढची
चतुर डोळ्यांची विभोर पल्लवी,
उरांत दुखणारे, दुमदुमणारे धुमारे,

ओठांचे अबोल मसुदे, छापे,
खोल एकच एक नटलेलें समूळ वादळ.

ऐक,
हें सगळें घेऊन तुला मिरवित रहायचें आहे
प्रत्येक उंबऱ्यावर
ओळखीच्या गोंवणींत, गुणगुणींत.

# हात

डोळ्यांनीं कांहीं दिलें नसलें तरी
हात कधींच फसवीत नाहींत.
आणि त्यांच्यावर जेव्हां उठते
एक वंचित ओठांची मुद्रा
तशाच एक मुक्या-मुक्या पांखरासाठीं,
ते कलम करून जातात
हृदयांतून फुटणाऱ्या एका धमनीवर
बहारीच्या सोनेरी फळांची डहाळी.

वर असतें नुसतें सांठवलेलें आकाश,
अचानक ओठंगलेलें.
उरतात ते फक्त
कांचेपलीकडचे
डोक्यावरच्या निरर्गल झुलुपांतून
सुदूर बाहणारे डोळे,
निरंत निसटलेले दुहेरी हात.

तो म्हणाला,
होय, मला पक्ष्यांची भाषा समजते.
आतां तो त्या वडावर
कंदाहारी आहे.
तो म्हणतो आहे :
कु चु कु क्–चु व व्
कु चु कु क्–चु व व्
म्हणजे : मी हा इथें आहे;
तूं कुठें आहेस ?
त्याला उत्तर :
कु च व व–चू चं क्
कु च व व्–चू चं क्
(हे तो प्रत्यक्ष तशाच पक्ष्यासारखे उद्गार काढतो.)
याचा अर्थ :
मी ही इथें आहें,
पलीकडच्या सांवरीवर.
वास्तविक
'पलीकडच्या सांवरीवर'
हें तिला सांगण्याची जरूर नाहीं.

केवळ आवाजावरून
तो कुठून येतो,
कुणाकडून येतो,
किती अंतरावरून येतो—
हें सगळें त्याला समजत असतें.
त्याचें रेडार पक्कें असतें.
(या वेळीं मात्र तो फसला आहे
कारण
मी आवाज तिकडून जसा येईल
तसा काढला आहे.)
पहा तो उडालाहि त्या सांवरीच्या झाडाकडे.

मी म्हणालों,
छान,
म्हणजे इकडेहि ही 'मी इथें : तूं कुठें?'
असलीच भाषा आहे तर!
त्यांनाहि कांहीं दुसरे विषय नाहींतच काय?
उदाहरणार्थ,
ही वडाची फांदी खचली आहे,
आज सगळ्या आळ्या गडप कुठें झाल्या?
इथून निघूनच जाऊं या का?

तो म्हणाला,
आहेत, कां नाहीं ?
पण असं काहीं बोलायचं झालं कीं
त्यांना परमिट काढावं लागतं.

मी म्हणालों,
छान,
म्हणजे इथेंहि बडगा आहेच तर !

तो म्हणाला,
आहे आणि नाहीं.
भाषा ही इथून तिथें सारखीच.
म्हणजेच :
चु च चौ–कु कौ.

पुष्कळ वर्षें तूं कांहीं बोलली नाहींस
आज एक-एक सांगते आहेस
नको आहे त्याच्या पलीकडचें
हवें आहे तें अघोरपणें वगळून

तुझ्या मुठींत असतो एक पारदर्शक जीव
चौऱ्यांशीचा फेरा पुरा केलेला
तो तिथें राहील तर आपल्या मर्जीनें
तुझ्या मर्जीलाहि भुलावून

त्याचें तो कांहींच लागत नाहीं
तुला विचारील त्यालाहि तो पुढचें विचारील
कोणत्याहि परिस्थितींत तो असणारच
त्या—त्या तुझ्या हातालाहि विचारून पहा

ते होते जेव्हां त्याच्या गळ्यांत
तेव्हां सर्व कांहीं हरवलेलें होतें
—पण मीं हें असें कांहींच बोलतां नये
आज बोलायचें आहे तें तुला

होय, आज तुला बोलायचें आहे
चतुर शब्दांना वाट दिली पाहिजे
आकाशाचें कवच घट्ट पांघरलें पाहिजे
नसलेलें अकारण वसवलें पाहिजे

*जगाच्या फटक्यांत*
*चार ओठ काय*
*दोन दोहोंवर*
*उगाचीच हाय*

*सांडलेल्या डोळ्यांत*
*कशाचाहि कांठ*
*बकाऊ गुल*
*हुकलेली वाट*

*सोनेरी पिंजरा*
*सोनेरी पक्षी*
*तळ्यांत हरवली*
*सगळीच नक्षी*

हेंहि गाणें कधीं भेटलें होतें तुला
वेटाळ्याच्या गुहेंत, चार खुरांवर मोकळी होतांना
झपाटलेली झाडी तेव्हां मागें—मागें होती
वाऱ्याची अजागळ शीळहि गळाली होती

तुला आतां हें सगळ्यांनाच विचारायला पाहिजे
कोणाला काय म्हटलें म्हणजे काय भेटतें
आणि पुन्हां उशाला हात किती असतात
दोन हात तूंच जायबंदी केल्यावर

होय, मी रडलों आहें पुष्कळ
न समजतां, समजल्यावरहि
एक सूर्य जेव्हां उठलाहि नव्हता
दुसऱ्या सूर्यासाठीं

*सात जुने*
*सात नवे*
*अश्व तुझे*
*नश्वर हे*

*काय उगा*
*आक्रमिसी*
*दुर्दिन हे*
*उजवीसी?*

*आग तुझी*
*मीं प्यालों*
*आकंठच*
*अन् घालों*

म्हणून सांगायचें आहे तें सांगून घे
मधेंच थांबून जर एखादा उसासा टाकशील
तर सगळें कांहीं हरवून जाईल
वाऱ्यालाहि आपली जाग येईल

तो केव्हांचा शोधतो आहे एकटाच
एखादा कमी दाबाचा पट्टा
तापलेल्या भूगोलाचा अचानक
काबीज करायला एक कपटा

मोठ्या शर्थीनें तो उडवून देईल
अस्मान् झोडणारें तुंबळ वादळ
त्याला आवरतां येणार नाहीं स्वत:ला
इतका झालेला असणार तो असहाय

होय, असहाय एका शब्दासारखा
जो उच्चारलाहि गेला नाहीं
आणि सगळीं पांखरें जेव्हां घोटाळलीं
पानफुट्या घळीवर

*मनाची कोंवळीक*
*रानाची जवळीक*
*देहाची मोकळीक*
*राधेला । राधेला*

*शेल्याची चवरी*
*वाळ्याची भोवरी*
*ओठांची पांवरी*
*राधेला। राधेला*

*सांवळ्याची संगत*
*डोहाची लग्गत*
*गळ्याची अग्गत*
*राधेला। राधेला*

मग बोलशील ना अगदीं मनांतलें
एकांत एक गुंतून मोकळें झालेलें
जें आतां सगळेंच पारखें झालेलें असणार
दूर फसलेल्या चांदण्यांच्या सारखें

ज्यांच्या प्रकाशाची फिकट फीत
आकाशाच्या नडलेल्या पोकळींत
उगाच लटकत असते
—वेधशाळेंत आज मोजतां येणारीं प्रतिगामी वर्षें घोकीत

मी अगदीं शांत, निवांत राहीन
पहिल्यापासून जसा होतों तसा
विसरायचें तें सगळें विसरून
आठवायचें तें सगळें परतवून

तुझ्या शब्दांना तुझ्या डोळ्यांसारखेंच न्याहाळून
त्यांना त्यांची अगोचर वाट देत
—अर्थाला ते लालचावतील
तर पुढें आहेच माझ्या मनाचें पठार

*गोदेच्या कांठावर*
*वेळूंची शीळ*
*फागांतल्या थंडींत*
*दांतांला खीळ*

*चारी हांकेवर*
*धुरांचीं घरटीं*
*वेळूंच्या कोंडींत*
*आगिन घिरटी*

*रंगाऊ हातांना*
*उरांचा थाट*
*वेळूच्या बनाची*
*भिजली वाट*

अगदीं कडाडून सगळें सांगणारी दुसरी एक वाट
मीं तुडवली आहे भिजऱ्या पायांनीं
जिथें कोंभ आले तिथें
सपशेल खालीं पडून गुंथवले आहेत

माझे ओठ, माझ्या नाकपुड्या, पंजांचीं टोकें, बाहू, बाहू
तिथेंच थोडा वेळ रुजलोंहि
त्यांच्यासारखाच एकटोक होऊन
'जे जसें व्हायला पाहिजे होतें तें'[1]

—तें तें तसेंच होतें नियंत्रित प्राग्रचनेनुसार
एकमेकांचा अतर्क्य आधार घेत
त्याचा विचार नुसता विचारच राहूं देत
विभक्त, गैरवाजवी

*किंचित् काळाचें कलणें*
*नांव असो त्या कांहींही*
*माझा मी उरतच नाहीं*

*कभिन्न त्या कांठावरतीं*
*रात्र मुलायम संलक्षी*
*महाप्राण अन् कुणि साक्षी*

*भेदी त्याचे जरि पंख*
*खोल पलिकडे काय वसे*
*त्याचें तोंहि न जाणतसे*

---

१. τὸ τί ἦν εἶναι : what it was meant to be.

*अन्*
*उगा सोयरा जन्मींचा*
*ओळख अपुली सांडीत*
*रूप-सांकडें घालीत*

आणि मी तर असा नव्हतोंच कोणीहि
केवळ तुझ्या शब्दावर ओठंगलेला वर्ण-वेडा
'नाहीं'च्या मुक्या पडद्याच्या मागें
'होय'च्या हरिखाई वाटेवर शुभंकर

एक-एक जिथें सगळें गळून जातें
आपल्यांतच अनंग मिळून जातें
हरवून सगळें पिळवटून नेतें
पुन्हां अशाच एखाद्या अकल्पित वाटमारीसाठीं

जिथें तूंहि असशील आणि मीहि
अपरिचितीचे दोन साथी
ओठांवरचे सगळे शब्द फिरवून
आणि तरीहि सगळें, सगळें कांहीं वदवीत

*हें तों अलोकींचें आळोंचणें*
*वेल्हाळेचें वोळविणें*
*आपुलें आपुलेनि अंगविणें*
*प्रियाळ*

# श ह ना ज़

हें गाणें म्हणजे तूं नाहींस
आणि तरीहि हें गाणें तुझें आहे
कधीं काळीं तें माझेंहि होतें
—म्हणून मी होतों, आहें
तूं आहेस
हें गाणें गाणें आहे.

१.

शहनाज़
पहिल्यांदा काल दुपारीं दिसली
ज्या रूपांत ती स्वतःला
चाहत होती त्या—
थोडी पाठमोरी,
कमरेवरचें ढळणारें वस्त्र तसेंच
ढळूं देत
बाजूला होता एक नोंकदार
पुराण्या ढंगाचा आरसा.

आणि जेव्हां ती पुन्हां
आज पहांटे-पहांटेच आली
सांगूं लागली :
मी आहें तीच पुरातन आर्या
पहा ना
तुमच्यासाठीं होऊन राहिलें आहें
मनस्विनी दाक्षायणी

तापसी उमा
गायत्री सीता
स्वरविद्धा राधा
जघनघना पांचाली.

त्या क्षणापासून मी अलग पडलों,
        उरलों नाहीं
आतां ठाऊक नाहीं
काय काय होईल
—काय सांडावें लागेल
कारण ती येईल पुन्हां पुन्हां
—येईल आणि लपेटून घेईल.

२.

अशक्यच मी मागत होतों.

योद्ध्यांचा वाटेंत खच पडला होता
केवळ एका दरडीवरून
वर जायचा मार्ग होता
त्यावेळीं जें मनांत दाटून आलें
तें कसें सांगणार ?
असहाय मी
आणि असणार तूं कुठें तरी वर
        एखाद्या बुरुजावर, सज्जांत.

इतक्यांत अचानक
कुणीं तरी मला हात देऊन
वर नेतें आहे असें वाटलें
झपाझप मी चढून गेलों
दगड, झुडुपें, कांटे
—जणूं माझ्यासाठींच मुलायम गालिचे झाले
आणि अनपेक्षित थेट तुझ्यापाशीं आलों.

एवढ्या सर्व कोलाहलांत
तूं होतीस स्वस्थ
निश्चिंत बसलेली
दगडी कट्ट्यापाशीं
चित्रांतल्या गौरीसारखी
आत्ममुग्धा.

मला तुझ्याकडे ओढून आणण्यासाठीं का हें सर्व ?
कीं तुला कशाचेंच कांहीं नाहीं ?
मग मीं ध्यास घेतला तो कुणाचा ?
श्वास रोधून
तुझ्या डोळ्यांच्या पापण्यांचे
एक एक केस मोजले
ते कशासाठीं ?
कां, कां हे दरवेशी ओठ
दुरूनच गळून पडले
तुझ्या व्रतस्थ बोटांच्या टोकांवर ?
शहनाज़,
शहनाज़.

३.

दिवसा मी हा असा बंदी
आणि रात्रीं तुझा बंदीजन.

झरोक्यांतून जे कवडसे येतात
त्यांना असते चांदण्याची धार.

दूर कुठें तरी
वेळ चुकलेल्या कोकिळेचा कल्लोळ.

गस्त
मी माझ्या मनामधेंच घालतों
संवयीनें
एखादा हृदयाचा ठोका ओलांडीत.

वर्षानुवर्षे इथें कुणी राहिलें नसेल.
आणि म्हणूनच का
ही सोयीची जागा, शहनाज़
तूं पसंत केलीस

माझ्यासाठीं
रात्रीच्या परिमाणानें दिवस
मोजतां यावा म्हणून ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

४.

गड ओरबाडून जेव्हां मी चढून आलों
तेव्हां तुझ्या डोळ्यांची
एकच हांक मला वेढीत होती.

आतां मी न पहातांहि
तिचे प्रत्येक बुरुजावर
बाहुटे झाले असणार
प्रत्येक दगड आपली गुंफण सांभाळीत
अधिक जागरूक झाला असणार.

प्रकाशाची त्यांना बंदी नाहीं.
झुडुपांना, अचानक गुरफटणाऱ्या वेलींना
ते झेलून झुलवीत असतील.

दिवस हा असा जातो
शहनाज़
रात्रीच्या आसऱ्यानें.

५.

ही कोठी थोडी सुधारतां येईल
त्या उजवीकडच्या कोपऱ्यांत
दोन पानांची एक किंचितशी लव उमलली आहे
रोज चूळभर पाणी दिलें
कीं ती वाढेलहि
काल तूं मला आपला महिरपी आरसा
दिलास
—माझी मला सोबत व्हावी म्हणून—
त्यानें आतां संध्याकाळीं
झरोक्यांतून येणारें ऊन वळवून
तिला न्हाणतां येईल.

पांखरांना म्हणावं थोडा धीर धरा
बाग तयार होत आहे
शहनाज़ येते ती बागशाही घेऊनच
तिच्या अंगाअंगावर तुमचे सूर
टिपून घ्या
जपून, वाजवी.

६.

माग म्हटलंस म्हणून मीं मागितले
तुझे उघडे, मोकळे स्तन.

मला काय माहीत
ते अनपढ हातांचीच चुबकणी करतील
गाफील ओठांचाच चुंफा घेतील ?

कांहीं मागणंच
किती मुष्किल केलंस
शहनाज़.

७.

केशराचं उन्ह तूं घेऊन येतेस
तेव्हां रात्रीच्या दोन घटका
संपलेल्या असतात.

पुष्कळ वेळ तूं कांहीं बोलतच नाहींस
मधेंच एखादा उच्छ्वास फैलावेल
तेव्हां समजायचें
तूं आहेस, आहेस.

मोकळी तुला करावीच लागत नाहीं.
किती थंड, थंड असते
निमूट काळोखाच्या विळख्यांतील पश्चिगी.

पण ओठ हे असे घट्ट, घट्ट
अविभक्त कां?
कोणालाच कांहीं बोलतां येऊं नये म्हणून?
कीं त्यांनाच फक्त आपण होऊन
        मोकळें होतां येत नाहीं
शहनाज़ ?

८.

वराङ्कावरच्या
दोन उभार खुळखुळ्या पाकळ्यांना
किंचित् दांतांनीं ओठ देतांना
मीं वरच्या तुला
पाहिलेंच नाही
काल.
तूं होती असणार डोळे मिटून
उरावर हात मुडपून, अंतःस्थ.

आज पाहीन
जर हें माझें सगळें मुखच
शहनाज़
तूं सनास घुसमटवून टाकणार नसशील तर
पुन्हां
त्या गंधलोळांत तसेंच
तिथेंच.

९.

*"प्रीत कीं मरण कीं*
*कोण करिल निवड काय?*
*प्रीत तीच मरण होय*
*मरण हाय प्रीत ती."*

मधूनच
नकळत सांभाळलेले
हे असे कधींचे दूरचे सूर
पुन्हां एकदां विंधून जातात.

तूं म्हणशील :
गाणाऱ्याला असतें अविलंब
स्वराचें बंधन
त्यांची धुंदी, निखालस बंदिष
तो असतो
सगळ्या अर्थांच्या पलीकडे.

पण ऐकणारा असतो, शहनाज़
सुरांच्याहि पलीकडे
—दयावंत दैवाच्या देहलीवर
त्याला मरण नसतें
तो असतो एकटा
अकाल
इथें-तिथें
केवळ शहनाज़.

१०.

प्रत्येक पावलाची चाहूल
तशीच असते
अडसरांची कुरकुर
तेंच आवर्तन घेते.

श्वासांची हवा मात्र वेगळी असते
—मुलुख-मल्हार.

आणि तेवढ्यानेंच
हें बंदिस्त जीवन सुसह्य होतें
शहनाज़
वाढणाऱ्या ताल-चक्रांत.

११.

वर्षानुवर्षे अवघडलेल्या भिंतीचे
भारावलेले पापुद्रे
अचानक घेतात
एका मायावी भव्य चित्राची कळा
—सारा आसमंत उधळीत
आपणच घडवलेल्या बंदिस्त सोनेरी
चौकटींत.

लगतची माझी दगडी शय्याहि
येते बहरून
परांच्या बिछाइतीनें
जिथें मी दुरून पाहतों मलाच
तुझ्या वक्षावर ओथंबलेला
—चित्रांतल्या त्या डावीकडच्या
नादावलेल्या झाडासारखा.
तूं दिसतेस तृप्त मोगरीसारखी
नितांत मोहरलेली
शुभ्र शुभ्र

तुझ्या अकल्पित हिमशार केसांसकट
अगदीं सगळ्या आठवणींच्या
पलीकडे.

आणि
कित्येक युगांनंतर, शहनाज़
जेव्हां मी उठून बसतों
सुस्नात
तुझ्या डोळ्यांच्या आंगणांत
तुझ्या डाव्या कुशीला
त्याच चित्रांतल्या ओथंबलेल्या झाडाखालीं
तूं आपल्या निःशब्द हातांनीं
थोपटून
केवळ करतेस
माझ्या पहाडी उत्तरीयाच्या
चुण्या पुन्हां फणीदार
तशीच न उठतां
सुजाण.

१२.

कित्येक दिवस तूं येतच नाहींस
....येतच नाहींस.

आणि प्रत्यक्षाला स्वप्नाचें सत्य
कधीं उलगडेल का
हें मी मलाच विचारायला लागतों.

त्याला असतो शाप
त्याच्याच विस्कळित बंधनाचा.

पण स्वप्न असतें एकच
शहनाज़
असंख्य शक्यतांची जाण
सतत फुलवित ठेवणारें.

आश्वासनाला
नुसता न घेतलेलाहि
श्वास पुरतो.

आणि तूं तर उधळून दिला होतास
पुरा खज़ाना

मग हें असें कां
शहनाज़ ?

कीं दुर्दैव हेंहि एक स्वप्नच
प्रत्यक्षाला न परवडणारें ?

१३.

खरोखर मी काय मागत होतों ?
सुटका ?
तिचेंहि एक विपर्यस्त आवेदन ?
काळाचें पुन्हां एक नवें आव्हान ?
सगळ्या आठवणींचा पूर्णविराम ?
अकल्पिताचें प्रच्छन्न वरदान ?
आणि या सर्वांवर
तुझ्या सुबंध अंगांगाचें
अपराजित यास्मिनी भाष्य ?

मला कळत नव्हतें
तेव्हांपासून तूं कळलीस
हाच जर माझा गुन्हा असेल
शहनाज़
तर मी मागेन
तें पहिलें अज्ञान
ज्यांत तूंहि असशील निश्चयानें

वेगळ्यानें
तशीच कळलेली.

१४.

पण
मला हें असें कष्टी होऊन
उपयोगाचें नाहीं.
तुझें तें आश्वासन
केवळ माझ्या उत्तरीयालाच
नव्हतें :
तें होतें आंतल्या बारा पाकळ्यांच्या
हृत्कमळालाहि
त्यांतल्या हंसविशेषाला.

तुझी संगत ही अशीच राहणार आहे
शहनाज़.

तुला हवें आहे आतां
एक विमुक्त स्पंदन
बाराहि दिशांचे वारे
—जे तिमूरलाहि आपल्या मुलीसाठीं

खुले ठेवावेसे वाटले
तिची कब्र बांधतांना
समरकंदला—
हवें आहे दंवाचें न्हाण
आणि चांदण्यांची पखरण
उन्हाचा आग्रही अभिसार
पांखरांची टिपूर सोबत.

हें सगळें, सगळें
आणि पुन्हां मीहि
शहनाज़.

१५.

कोठीची भिंत सरकवून
भुयारांतून
बाहेरच्या अंधारी पटांगणांत
मला घेऊन येणारा
नवा आरक्षक.

तूंच तो होतीस, शहनाज़
हें मला कळलें
अधीर घोड्यावर
मला ओढून घेतांना
तुझा शिरपेंच ढळला
तेव्हां.

किती सहज, सफ़ाईनें
युध्यमान झाली होतीस तूं,
आणि कळलें
खरी वाट एकच असते —

अंधारांत
काळाच्या अनोळखी समरभूमीवर.

हें माहीत असतें
तुझ्या
धगधगीत पत्रमान घोड्यालाहि
तुझ्या मांडीखालीं.
तो उच्छृंखल होत नाहीं.
किंचित् फुरफुरला
तरी तें नव्या समजुतीनें.
स्वतःची दमछाकहि
तो संपूर्ण आवरूं शकतो.

लगाम मीं तुझ्या हातून
मागूनहि घेत नाहीं
काळोख चहूंबाजूंनीं
घोंघावत असतांना.
केवळ उरतों देहस्वरूप
माझ्या हातांचा विळखा
तुझी दौड अडवणार नाहीं
इतकेंच पहात :

तुला सांभाळीत, हे तारिणी

१६.

हें झाड
प्रकाशाची ही पहिली देन
विनासायास बहरलेली हवा
पांखरांची तिरकस चुवंचिका
घोटाळून मधेंच थबकणारी
        एखादी खार
गवतावरच्या फुलचुखी पाकोळ्या
बाजूचा आळसावलेला ओढा
—तुला जाग येईल म्हणून
श्वास आवरून
मी हें सांठवून घेतों आहें.

रात्रींचें तूं सगळें
विसरून गेली आहेस
तुझा वेत्रहि आहे नवा
—दुसराच, देहाती.

सगळें हरवून गेल्यावर
जें सांपडतें
त्याची अनाम खूण
मी जपतों आहें
शहनाज़.

## १७.

मनाला समजावण्याचे:मार्ग
असतात पुष्कळ
पण सर्वच शेवटीं
तुझ्यापाशीं येऊन थबकतात
शहनाज़.

माझा प्रवास तर अजून
सुरूहि नाहीं झाला
अमिताभ प्रज्ञेच्या प्रकाशांत.

तो होईल
तेव्हांहि तूं अशीच असशील का
सन्निध, सर्वमयी ?

तुझ्याकडे
असें पहात असतांना
क्वचित् चुकतोहि

काळाचा निःस्वप्न ताल.
त्यालाहि भूल पडते
आपल्या अगतिकतेची.

आणि
मानेला किंचित् हिसका देऊन
झाडाला बांधलेला पवमानहि
होकार देतो मला
नव्या दौडीच्या धुंदींत.

७८८६
२१११

१८.

इथून पुढें आसरा आहे
जो कुणी कधीं कांहीं मागणार नाहीं
त्याला.

प्राण जो प्रीतीनें मोजतो
कसल्याहि साक्षीविना.

ज्यानें भोगलें आहे
सगळ्या भोगांच्या पलीकडचें
सुखदु:खांचें आसव.

ज्याला पटली आहे ओळख
अनित्याच्या शाश्वततेची.

ज्याचें मन बनलें आहे
एक सुगंधाचा कोष
तुझ्या करुणेच्या भाग्यानें.

REFBK-0018595
REFBK-0018595